

भाजपा

शिवसेना





विकसित मुंबई

सुरक्षित मुंबई

## बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६

## भाजपा-शिवसेना-रिपाई (आ) महायुतीचा

# वचननामा



# खड्डेमुक्त मुंबई

- ९ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते डांबरी (Asphalt) आणि ९ मीटरपेक्षा जास्त रुंदीचे रस्ते सिमेंट काँक्रीटचे (CC) करणार. ९ मीटरपेक्षा मोठ्या रस्त्यांवर यूटिलिटी डक्ट (Utility Duct) तयार करणार जेणेकरून रस्ते खोदणे बंद होईल.
- नियोजित डीपी रोड (DP Road) ताब्यात घेण्यासाठी नोटीस देऊन कार्यवाही करणार.
- Pvt. layout मधील रस्ते डांबरीकरण करणार व त्याची मालकी अबाधित करणार.
- मुंबईतील सतत पडणाऱ्या खड्ड्यांचा तोडगा काढण्यासाठी मुंबईकरांना देण्यात येणाऱ्या १७ सेवांकरिता वारंवार खड्डे खणण्यात येतात. त्यामुळे या १७ सेवांकरिता मुंबई भर (Utility tunnel) बनवण्यात येणार.



# वाहतूक व्यवस्था

- रस्त्यांवर डिजिटल सूचना फलकांद्वारे वाहतूक माहिती देणार त्यासाठी जास्तीत जास्त डिजिटल फलक मुंबईमध्ये लावणार: डिजिटल सूचना फलक वाहनचालकांना वास्तविक-वेळ वाहतुकीची परिस्थिती, रस्त्यावरील बंदिस्त, आणि बांधकाम क्षेत्रे माहिती प्रदान करण्यासाठी वापरले जातील.

# पाताललोक

- कोस्टल रोड (टप्पा १): मरीन ड्राईव्ह ते वरळी दरम्यानचा वेगवान प्रवास; मुंबईतील पहिला समुद्री बोगदा कार्यान्वित.
- मुंबई मेट्रो लाईन ३ (Aqua Line): कुलाबा-वांद्रे-सीप्झ ही मुंबईतील पहिली पूर्णतः 'अंडरग्राउंड' मेट्रो संपूर्ण मार्ग प्रवाशांसाठी खुला झाला.
- ठाणे-बोरीवली अंडरग्राउंड टनेल: संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणारा हा बोगदा बोरीवली आणि ठाण्यातील अंतर अवघ्या १०-१५ मिनिटांवर आणेल.



- गोरेगाव-मुलुंड लिंक रोड (GMLR): पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा चौथा महत्त्वाचा दुवा, ज्याचे काम वेगाने सुरू आहे.
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह बोगदा: पूर्व मुक्त मार्ग (Eastern Freeway) आणि कोस्टल रोडला जोडणारा भूमिगत मार्ग, ज्यामुळे दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी पूर्णतः संपेल.

# फूटपाथ

- शहर पादचारीस्नेही व टिकाऊ बनवण्यासाठी सर्व फुटपाथ स्टॅम्प्ड कॉंक्रीटमध्ये विकसित करणार. (Right to walk)



# मुंबईकरांसाठी फेरीवाले धोरण

- सर्व पात्र फेरीवाल्यांचे हॉकिंग झोन्समध्ये पुनर्वसन करण्यात यावे आणि हॉकिंग झोन्स व्यतिरिक्त इतर सर्व क्षेत्रे नॉन-हॉकिंग झोन्स म्हणून घोषित करणार.
- सर्व पात्र फेरीवाल्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करून त्यांना त्वरित 'विक्रेता प्रमाणपत्र' (Vending Certificates) आणि ओळखपत्र देणार.



# पार्किंग

- रस्त्यावरील पार्किंगसाठी कम्युनिटी पार्किंग (Community Parking), तसेच रिक्षा आणि मोटारसायकल पार्किंगची व्यवस्था करणार.
- शहरातील पार्किंगची क्षमता वाढवण्यासाठी भुयारी व जमिनीवरील पार्किंग निर्मिती करणार.



# मोकळ्या जागा व मैदाने

- शहरातील सर्व मोकळ्या जागांची देखभाल केवळ महापालिकेकडूनच करणे; देखभाल/पालनपोषणासाठी खाजगी सहभाग नको. स्थानिक नागरिक संघटना तसेच ALMs यांना पहारेकरांची भूमिका देणार.



- G / RG / PG / Parks / Open Spaces यांचे संरक्षण व पुनरुज्जीवन कायद्याने सुनिश्चित केले जाणार. बंधनकारक कर्तव्य करून अर्थसंकल्पाचा भाग करणार.

## मुंबईकरांचा पाणी हक्क - मागेल त्याला मुबलक पाणी

- संपूर्ण मुंबईमध्ये मुंबईकरांना २४*७*३६५ स्वच्छ व गुणवत्तापूर्ण पाणी देणार.
- सध्या पाणीपुरवठा ३८०० MLD आहे त्या वरून तो ४७०० MLD पर्यंत करणार. गारगाई, पिंजाळ, दमणगंगा, पाणी प्रकल्प येत्या ५ वर्षात पूर्ण करून ही प्रणाली तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संपूर्ण आधुनिक करणार व त्याची क्षमता वाढवून मुंबईकरांना अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देणार.
- प्रत्येक प्रशासकीय विभागात पाणी गळती शोधक यंत्रणा (Leak detection system) आणि कॅमेरे बसवणार.
- प्रत्येक झोनमध्ये फ्लो मीटर (Flow Meter) बसवणार व समान पाणी वितरण करणार.
- दरवर्षी होणाऱ्या ८% पाणी दरवाढीला पाच वर्षांसाठी स्थगिती देणार आणि पाण्याचे दर स्थिर ठेवणार.
- मुंबईत गोराई येथे समुद्र जलनिस्सारण (Desalination) प्रकल्प उभा करून समुद्राचे पाणी गोड करून मुंबईकरांसाठी उपलब्ध करणार.
- दहिसर, पोईसर आणि मिठी नदींसाठी कायापालट धोरण, नदीकाठ विकास प्रकल्प राबवण्यात येणार.
- जलव्यवस्थापन प्राधिकरण समिती तज्ज्ञांच्या सहभागितेने कार्यरत करणार.
- "टँकर माफिया फ्री" मुंबई हे धोरण राबवणार.



### पर्जन्यजल साठवण (Rainwater Harvesting)

- Rainwater Harvesting करणाऱ्या नागरिकांना Water Bill / Property Tax मध्ये सवलत देणार.
- नवीन इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टिंग (Rainwater harvesting) बंधनकारक करणार आणि जुन्या इमारतीसाठी नगरसेवक निधी किंवा विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करून हे प्रकल्प राबवणार.
- Waste Water Treatment Plant (WWTP) मधील शुद्ध प्रक्रिया जल व्यावसायिक कामासाठी वापरणार.



# ध्येय पूरमुक्त मुंबईचे

- जपानी तंत्रज्ञान, आयआयटी (IIT) आणि व्हीजेटीआय (VJTI) च्या मदतीने येत्या ५ वर्षात मुंबईला पूर्णपणे पूरमुक्त (Flood-free) करणार, पर्जन्य जलवाहिनीचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी उपाययोजना करणार.

- शहराच्या भूआकारमानाचा (टोपोग्राफी) विचार करून पूरस्थितीचा अभ्यास व उपाययोजना करण्यासाठी IIT तज्ज्ञांचा संशोधन गट नियुक्त करणार.
- मुंबईतील पाणी निचरा प्रणाली सुधारणार, जुन्या आणि अकार्यक्षम पाणी निचरा प्रणालींची पुनर्रचना करणार आणि शहरात ४ नवीन भूमिगत फ्लडवॉटर टाक्या उभारणार.
- ब्रिमस्टोवाड २ ची अपूर्ण कामे लवकर पूर्ण करणार.
- सतत पूर येणाऱ्या भागात पंपिंग स्टेशन्स उभारून जलदगतीने पाण्याचा उपसा करणार.



# स्वच्छ व सुंदर मुंबई

- स्वच्छतेबाबत जनसहभाग वाढवण्यासाठी मुंबईत विविध भागांमध्ये वर्षभर चालणारी स्वच्छता स्पर्धा आयोजित करणार.
- मुंबईचे रस्ते कचरामुक्त करणार.
- झोपडपट्टी भागातील कचरा संकलनासाठी छोट्या गाड्या पुरवणार. शक्य तिथे दिवसातून दोनदा कचरा संकलन करण्याची व्यवस्था करणार.
- झोपडपट्टी भागातील सार्वजनिक शौचालयांना वीज आणि पाण्याची सोय (बोअरवेल किंवा रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे) उपलब्ध करून देणार.
- ई-वेस्ट आणि प्लास्टिक वेस्टसाठी महापालिका वेगळी यंत्रणा उभारणार.
- मागेल त्याला शौचालय धोरण आणणार (घट-पट)
- स्वयंसेवी संस्थांशी भागीदारी करून स्वच्छता मोहिमा राबवणार.
- मुंबईतील समुद्र किनारे आणि नद्या स्वच्छ करणार, सुरक्षा व देखभाल करणार.
- दत्तक वस्ती योजना अधिक प्रभावी करणार.
- उष्णता कमी करण्यासाठी वैज्ञानिक तज्ज्ञांची समिती स्थापन करणार व धोरण राबवणार.



# घनकचरा व्यवस्थापन



- कामगार भरती करणार आणि कचरा व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना चांगले वेतन आणि सुविधा उपलब्ध करून देणार.
- पायलट प्रकल्प म्हणून 'Zero Waste Wards' विकसित करणार.
- कचरा प्रक्रिया करण्यासाठी डम्पिंग ग्राउंडवरील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पांचे काम पूर्ण करणार.
- मुंबईतील सर्व घरांमध्ये आणि व्यवसायांमध्ये कचरा वर्गीकरण प्रणाली लागू करणार आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करणार.
- मुंबईतील कचरा गोळा करण्याची प्रणाली सुधारणार. यासाठी, अधिक कचरा वाहने उपलब्ध करून देणार आणि कचरा गोळा करण्याची वेळ वाढवणार. तसेच, कचरा व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढवणार.

# संपूर्ण मुंबई मध्ये मलनि:स्सारण



- सध्या सुरू असलेल्या एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया) प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करणार.
- मुंबईतील सर्व सांडपाणी वाहिन्यांना आधुनिक करणार.
- सांडपाणी वाहिन्यांमधला गाळ काढणार आणि शुद्धीकरण प्रक्रियेचे आधुनिकीकरण करणार.
- सार्वजनिक खाजगी भागीदारी आधारित सांडपाणी वाहिन्यासाठी तंत्रज्ञान विकसित करणार.
- SRA मध्ये लघु सांडपाणी केंद्रे उभारण्यात येणार.

# पर्यावरण - स्वच्छ हवा, निरोगी मुंबई



- शहरातील हवेची गुणवत्ता तसेच एकूण पर्यावरण सुधारण्याकरिता शहरासाठी एक सर्वसमावेशक पर्यावरणीय आराखडा तयार करणार.
- धुळीवर नियंत्रण (Dust Mitigation): सर्व बांधकाम प्रकल्पांवर 'अँटी-स्मॉग गन' अनिवार्य करणार आणि रस्त्यांची नियमित 'मेकॅनिकल स्वीपिंग' व फॉगिंग करणार.
- प्रत्येक वॉर्डमध्ये उद्याने व हिरवे कॉरिडॉर विकसित करणार.
- Air Quality Display Boards प्रत्येक प्रमुख चौकात उभारले जाणार.

- १७,००० कोटी रुपयांची पर्यावरण संवर्धन योजना करणार.
- मुंबई महानगर पालिके अंतर्गत Tree Authority च्या आधारावर EPA (Environment protection Authority) तयार करणार.
- Air quality monitoring station ची संख्या दुप्पट करण्यात येणार.
- पर्यावरण समितीची निर्मिती करण्यात येणार.

## मुंबईचे सौंदर्यकरण


- आयआयटी (IIT) आणि व्हीजेटीआय (VJTI) च्या मदतीने 'सी व्ह्युईंग डेक' बनवणार.
- शहरात सार्वजनिक कला आणि भित्तिचित्रे अधिकाधिक प्रमाणात प्रदर्शित करणार.
- शहरातील तलावांचे सौंदर्यीकरण करणार.
- संपूर्ण शहरात झाडे आणि ग्रीन झोनची संख्या वाढवणार.
- नागरी सहभागितेसह सुशोभीकरण समिती कार्यरत करणार.



## शिक्षणाचा हक्क : शिक्षणाने सक्षम मुंबई

- दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महापालिका शाळांचे स्तर आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत उंचावण्यात येणार.
- महानगरपालिकेच्या सर्व शाळामध्ये AI लॅब्स तयार करणार.
- परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानातील मूल्ये महापालिका शाळांमध्ये शिकवले जाणार.





# स्वास्थ्य मुंबईकरांसाठी सुसज्ज आरोग्य प्रणाली - आपला दवाखाना

- रुग्णालयांचे आधुनिकीकरणः महापालिकेच्या रुग्णालयांचा दर्जा एम्स (AIIMS) च्या धरतीवर सुधारणार, प्रत्येक प्रशासकीय वॉर्डमध्ये डायलिसिस सेंटर आणि केमोथेरपी सेंटर उभे करणार.
- मोफत तपासणीः ६० वर्षांवरील सर्व वरिष्ठ नागरिकांना महापालिकेच्या रुग्णालयात वर्षातून एकदा मोफत पूर्ण शरीर तपासणी (Full body checkup) उपलब्ध करून देणार.
- 'मुंबईकर हेल्थ कार्ड': प्रत्येक नागरिकाचा संपूर्ण वैद्यकीय इतिहास डिजिटल स्वरूपात जतन करून उपचारांची प्रक्रिया वेगवान करणार.



- अद्ययावत 'आपला दवाखाना': प्रत्येक वॉर्डमध्ये ३०-४० प्रकारच्या रक्त चाचण्या, औषधे आणि प्राथमिक उपचार मोफत देणारी केंद्रे उभारणार.
- मोफत स्क्रीनिंग शिबिरे: मधुमेह (Diabetes), रक्तदाब (BP) आणि कर्करोग (Cancer) यांची मोफत तपासणी करण्यासाठी दर महिन्याला प्रत्येक प्रभागात फिरते दवाखाने असतील अशी योजना बनवणार.
- स्वस्त औषध केंद्रे: पालिकेच्या रुग्णालयांबाहेर २४/७ स्वस्त दरात जेनेरिक औषधे मिळणारी सरकारी औषधालये उपलब्ध करून देणार.
- मानसिक आरोग्य हेल्पलाइन: वाढत्या तणावावर मात करण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांची मोफत दूरध्वनी सल्ला सेवा चालू करणार.
- केईएम, नायर, सायन आणि कूपर रुग्णालयांना संलग्न परिघीय रुग्णालये उभारणार.
- Cervical कॅन्सर आणि Breast कॅन्सर मुली व स्त्रियांसाठी तपासणी मोफत करण्यात येईल.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना पूर्णपणे कार्यक्षम करण्यात येणार.
- कर्करोग उपचार केंद्र (Cancer Care): उपनगरात टाटा हॉस्पिटलच्या धर्तीवर महापालिकेचे अद्ययावत कॅन्सर रुग्णालय उभारणार, जिथे केमोथेरपी आणि रेडिएशन मोफत मिळणार.




- Diabetes Free मुंबई करणार.
- हृदयरोग रुग्णालय (Cardiac Care): हृदयविकाराच्या रुग्णांसाठी समर्पित रुग्णालय, जिथे अँजिओप्लास्टी आणि बायपास सर्जरी सवलतीच्या दरात उपलब्ध करणार.
- वाढते कॅन्सर रुग्णांची संख्या लक्षात घेता नायर रुग्णालयात १० मजली रुग्णालय उभारण्यात येत आहे. यात आवश्यक सर्व अत्याधुनिक व्यवस्था करण्यात येईल त्याच प्रमाणे सुपर Speciality सेंटर रुग्णालय उभारण्यात येईल.

# मुंबईत वैद्यकीय शिक्षण क्षमता दुप्पट
## (Medical Education for Mumbaikars)



- प्रत्येक मोठ्या BMC रुग्णालयात नवीन वैद्यकीय कॉलेज / PG इन्स्टिट्यूट NDA सरकारच्या मदतीने सुरू करणार.
- Med Tech च्या धर्तीवर Teaching Hospitals ची संख्या वाढवली जाणार.
- वैद्यकीय संशोधनासाठी Urban Health Research Fund स्थापन केला जाणार.
- सरकारी रुग्णालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हाय-टेक सिम्युलेशन लॅब्स बनवणार.
- मुंबईतील ७५ वर्षीय जेष्ठ नागरिकांसाठी ऑन कॉल रुग्णवाहिका व रुग्णांच्या निवासस्थानी डॉक्टर तपासणी करण्यात येईल.
- मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीप्रमाणे महापौर निधी ५००० पासून ५०,०००/- रुपयांपर्यंत करण्यात येईल.

# बीएमसी मार्केट



- मुंबईतील सर्व भाजी मंडई यांचे नूतनीकरण व पुनर्विकास करणार.
- बीएमसी मार्केटमध्ये मासळी विक्रेत्यांसाठी कोल्ड स्टोरेज उभारणार.
- कोळी भगिनींना बाजारात मिळणार आधुनिक सुविधा.
- Fish import export सेंटर स्थापन करण्यात येणार.
- लघु उद्योग धोरण राबवणार.

# पथदिवे



- संपूर्ण मुंबईमध्ये LUX सर्वे करणार.
- रात्रीच्या वेळी सामसूम वाटणाऱ्या भागात प्रकाश व्यवस्था उभी करणार.
- फुटपाथावर दिव्यांची संख्या वाढवणार.

# गृहनिर्माण

- कोळीवाडे व गावठणांसाठी विशेष योजना आणून पुनर्विकासाचा मार्ग खुला करणार तसेच COD बाधीत क्षेत्राकरिता लागू करणार.
- पुनर्विकासाला चालना, चाळींचा समूह विकास, इमारतींना ओसी, 'पागडीमुक्त मुंबई', फनेल झोनप्रश्नी जाहीर केलेली योजना जलदगतीने राबविणार.
- SRA लेआऊटमध्ये नागरिक सुविधांसाठी नगरसेवकांच्या निधीचा वापर करणार.
- गोराई/मनोरी गावांचा विकास आराखडा तयार करणार.
- झोपडपट्टीचा सुनियोजित व सर्वांगीण विकास करून अनेक सोयी सुविधा layout मधेच उपलब्ध करणार शासनाने पहिल्या टप्यात १७ प्रकल्पांना मंजुरी दिली असून पुढील टप्यात अधिक प्रकल्प समाविष्ट केले जातील.



- प्रकल्प बाधितांसाठी घरे उपलब्ध करून देणार.
- २० हजार इमारतींचे विविध कारणांमुळे रखडलेले भोगवटा प्रमाणपत्र (OC) तात्काळ वितरित करणार.
- मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरांतील टेनमेंट इमारतींसाठी पुनर्विकास धोरण राबिवणार.
- शाश्वत बांधकाम तत्त्वांचा अवलंब करून इमारतींमध्ये 'Living Forests' विकसित करणाऱ्या १० मजल्यांपेक्षा उंच इमारतींना विशेष सवलती देणार.
- सफाई कामगारांना हक्काचे घर देणार.
- मुंबईतील जुनी, जीर्ण आणि धोकादायक इमारतींना स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून नवे जीवन देणार.
- मुंबई पोलिसांच्या जुन्या, जीर्ण आणि अपुरी घरे यांच्या पुनर्विकासाला प्राधान्य देणार.
- रखडलेल्या योजनांसाठी TDR चा प्रभावी वापर करून पूर्णत्वास नेण्यासाठी तरतूद.
- शासकीय व निमशासकीय कर्मचारी व म.न.पा. कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबवणार.
- गावठाण व कोळीवाड्यातील सर्व घरे नवी मुंबईच्या धोरणाप्रमाणे महायुती सरकारच्या माध्यमातून नियमित करण्यात येतील.

# मुंबईकरांच्या 'बेस्ट' ला World's Best करणार

- २०२९ पर्यंत बेस्टच्या ताफ्यातील सर्व बसेस पूर्णपणे 'इलेक्ट्रिक' (EV) करून प्रदूषणमुक्त प्रवासाचे उद्दिष्ट साध्य करणार.
- प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी ताफ्यातील बसेसची संख्या ५,००० वरून १०,००० पर्यंत वाढवणार.
- मेट्रो आणि रेल्वे स्थानकांवरून घरापर्यंत पोहोचण्यासाठी 'मिडी' आणि 'मिनी' बसेसच्या फेऱ्यांत मोठी वाढ करणार.



- बेस्ट बस प्रवासामध्ये महिलांना ५० टक्के सवलत देणार.
- सर्व बस थांब्यांवर डिजिटल डिस्प्ले, सीसीटीव्ही कॅमेरे, मोबाईल चार्जिंग पॉइंट्स आणि वाय-फाय सुविधा उपलब्ध करणार.
- बेस्टचे आर्थिक नियोजन व डिजिटल जाहिरातीतून मिळणारे उत्पन्न याचे नियोजन करण्यासाठी IIT तज्ज्ञांचे अभ्यास मंडळ बनवणार.
- डेपो मध्ये वाचनालये उभारणार.

# मुंबईकरांसाठी अग्निशमन धोरण

- मुंबईच्या कोणत्याही कोपऱ्यात आग लागल्यास अग्निशमन दल ५ मिनिटांच्या आत पोहोचेल, असे 'स्मार्ट ट्रॅफिक प्रायोरिटी' सिस्टीमवर आधारित नियोजन बनवणार.
- उंच इमारतींवरील आगीचे सर्वेक्षण करण्यासाठी आणि बचाव कार्यासाठी थर्मल कॅमेरे असलेल्या 'फायर सर्व्हिलन्स ड्रोन्स'चा वापर करणार.




- सर्व गृहनिर्माण संस्था आणि व्यावसायिक इमारतींचे 'डिजिटल फायर ऑडिट' सक्तीचे करणार आणि त्रुटी आढळल्यास त्वरित दुरुस्तीसाठी पालिकेचे तांत्रिक सहकार्य देणार.
- प्रत्येक वॉर्डमध्ये स्थानिक तरुणांना 'अग्नि रक्षक' म्हणून प्रशिक्षण देऊन आपत्कालीन स्थितीत मदतीसाठी नागरिक स्वयंसेवक दल तयार करण्यावर भर देणार.

# युवा कल्याण धोरण

- शहरातील सार्वजनिक धोरणनिर्मिती व प्रशासन प्रक्रियेत युवक / जेन Z सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी जेन Z इंटर्नशिप कार्यक्रम सुरू करणार.
- बीएमसी च्या प्रत्येक एडमिनिस्ट्रेटिव वॉर्ड मध्ये जागतिक दर्जाचे स्पोर्ट कॉम्प्लेक्स व स्विमिंग पूल बांधणार.



- तरुण उद्योजकांसाठी पालिकेच्या बंद पडलेल्या जागांमध्ये कमी दरात हाय-स्पीड इंटरनेट आणि कायदेशीर सल्ला देणारी केंद्रे उभारणार.
- Start up / Innovation Hub मुंबईत ३ विभागात उभे करणार व १०० कोटींचा फंड्स ऑफ फंड करणार.
- स्टार्टअप Incubation Center TISS च्या सहकार्याने अभ्यासिका Circular economy ला प्रोत्साहन देण्यासाठी रिपेअर cafe उभारणार.
- स्पर्धा परीक्षांचा (MPSC/UPSC) अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक वॉर्डमध्ये वातानुकूलित, वाय-फाय सज्ज आणि चोवीस तास सुरू राहणाऱ्या अभ्यासिका उभारणार.
- मुंबईतील 'होतकरू' कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी मोफत 'ओपन एअर थिएटर' आणि कमी दरात रेकॉर्डिंग स्टुडिओ उपलब्ध करून देणार.
- उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या भूमिपुत्र विद्यार्थ्यांना विशेष 'मुंबई रत्न' शिष्यवृत्ती योजना चालू करणार.
- अधिकारी (BMC) कर्मचारी यांचा गुणवत्ता वाढीचे स्वयंसिद्ध भवन उभारणार.

# लाडक्या बहिणींना आत्मनिर्भर करणार

- लाडक्या बहिणींना आत्मनिर्भर करण्यासाठी व लघु उद्योग स्थापन करण्यासाठी ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज देणार.
- महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू विकण्याकरिता e-martket स्थापन करणार.
- कामकरी महिलांसाठी प्रत्येक वॉर्डमध्ये परवडणाऱ्या दरात 'म्युनिसिपल क्रेच' (पाळणाघर) सुविधा उपलब्ध करून देणार.
- मुंबईत महिलांसाठी मुबलक शौचालय बांधणार.
- महिला बचत गटांना शून्य टक्के व्याजाने कर्ज आणि त्यांचे उत्पादन विकण्यासाठी शहरात 'हक्काचे वेंडिंग झोन' उभारणार.
- 'मुंबई डिजिटल सखी' अंतर्गत महिलांना एआय (AI), कोडिंग आणि ऑनलाइन मार्केटिंगचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी लॅब उभारणार.
- महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'रात्रीचे गस्त पथक' (Night Patrol Squads) आणि त्वरित मदतीसाठी वन-टॅप मोबाईल ॲप बनवणार तसेच ड्रोन पॅट्रोलिंग करणार.
- शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण (Self Defense) अभ्यासक्रमात समाविष्ट करणार.



- महिला बचत गटांसाठी ३०,०००/- अनुदान देण्याचे प्रस्तावित आहेत. सध्या मनपा माध्यमातून २०,०००/- दिले जातात.


# सुरक्षित मुंबई

- सार्वजनिक ठिकाणांवर, रेल्वे स्टेशन, बस स्टॉप, पार्क आणि हॉस्पिटल इत्यादी ठिकाणी सुरक्षा वाढवणार.
- मुंबईतील सर्व ठेकेदार व सह ठेकेदार यांचे कॉन्ट्रॅक्ट लेबर व्हेरीफिकेशन करणार.
- महायुती सरकारच्या माध्यमाने रोहिंग्या व बेकायदेशीर बांगलादेशी मुक्त मुंबई करणार.



# मराठी अस्मिता आणि सन्मान

- मराठी भाषेच्या संवर्धन व प्रचारासाठी बीएमसीमध्ये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करणार.
- मुंबईच्या प्रत्येक विभागात मराठी नाटक, लोककला आणि साहित्यासाठी सुसज्ज 'मराठी कला केंद्र' आणि अभ्यासिकेची उभारणी करणार.
- फक्त मराठी चित्रपटा करीता खास मराठी मल्टिप्लेक्स उभारणार.



- मराठी कलाकार संस्थांना महापालिकेतर्फे पाठबळ देण्यात येईल.
- शाळेतील अभ्यासक्रमात 'मुंबईचा मराठी इतिहास' आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांची माहिती देणाऱ्या विशेष पाठांचा समावेश करणार.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त खालील पंचवार्षिक उपक्रम राबवण्यात येईल हे उपक्रम राबवण्याकरिता समिती स्थापन करण्यात येईल त्यासाठी विशेष आर्थिक तरतूत करण्यात येईल.



1. मराठी तरुणांसाठी शिक्षण - रोजगार - उद्योजक - यांच्याकरिता धोरण राबवण्यात येईल.
2. मुंबई महानगरपालिका रुग्णालयाच्या सलग्न हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ उभारण्यात येईल.
3. मराठी भाषेला अधिक समृद्ध करण्याकरिता उपाययोजना करण्यात येतील मराठी ग्रंथालय व संस्कृतिक केंद्राची संख्या वाढवण्यात येईल.
4. मराठी तरुणांसाठी मुंबई Fellowship सुरू करणार.
5. परवडणाऱ्या घरांचे धोरण करून मुंबईतून मराठी माणसाला हद्दपार होण्यापासून रोखणार व त्याची निती बनवणार.

# मुंबई सांस्कृतिक आणि पर्यटन विकास

- मुंबईची संस्कृती, कला व वारसा जतन व प्रोत्साहन देण्यासाठी बीएमसीमध्ये स्वतंत्र सांस्कृतिक विभागाची स्थापना करणार.
- शहरातील पर्यटनाला चालना देण्यासाठी बीएमसीमध्ये पर्यटन विभागाची स्थापना करणार.
- मुंबईतील कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देऊन शहराचे सौंदर्य वाढवणार. यासाठी शहरात महानगर पालिकेतर्फे  कला प्रदर्शनी, संगीत कार्यक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणार.



- ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) बूथचा वापर करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा अनुभव आणि महाराष्ट्राचे वैभव पर्यटकांपर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम राबवणार.
- दक्षिण मुंबईतील पुरातन इमारती, किल्ले (उदा. वरळी, माहिम, धारावी किल्ला) तसेच लेणी (मंडपेश्वर, जोगेश्वरी इ.) आणि गेटवे ऑफ इंडिया परिसराचे जागतिक दर्जाचे सुशोभीकरण व 'लाईट अँड साऊंड शो' करणार.
- मुंबईची मूळ संस्कृती असलेल्या कोळीवाड्यांमध्ये 'होम-स्टे' आणि 'खाद्य पर्यटन' (Seafood Tourism) विकसित करून पर्यटकांना अस्सल मुंबईचा अनुभव देणार.
- हुतात्मा स्मारक चौकात जागतिक दर्जाचं संग्रालय उभारणार.
- रवींद्र नाट्य मंदिराच्या धर्तीवर अन्य नाट्यगृहांचा पुनर्विकास करणार व गरज पडल्यास ३ नवीन नाट्यगृहे उभारणार.

# पालिका आपल्या मोबाईलवर




- नागरी सेवा व सुविधा आपल्या मोबाईलवर पुरवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार.
- भ्रष्टाचार मुक्त महानगरपालिका करण्याच्या उद्देशाने AI व डिजिटल प्लॅटफॉर्म आणणार.
- २०३४ DCPR लवकरात लवकर संपूर्ण अंमलात आणणार.
- महानारपालिकेची सर्व खरेदी Gem portal द्वारे करणार.
- बिल्डिंग अप्रूवल साठी AI आधारीत प्लॅटफॉर्म आणणार.

# वेगवान मुंबई... मजबूत अर्थव्यवस्था

- मेट्रोसाठी last mile connectivity देण्यासाठी POD TAXI प्रकल्पाला चालना देणार.
- कुर्ला BKC वांद्रे स्थानक पहिला टप्पा जोडणार.
- विक्रोळी कोपरखैरणे महापे मुरबाड ही कनेक्टिव्हिटी स्थापन करणार.
- वांद्रे सी लिंक BKC मार्गे नवी मुंबई विमानतळ भुयारी मार्ग तयार करणार.
- मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ मेट्रो ने जोडणार.
- वर्सोवा कोस्टल रोड विरार पर्यंत विकसित करून त्यांला ठाण्याच्या कोस्टल रोडला जोडून मुंबई MMR साठी Outer Ring Road बनवणार.
- BKC मध्ये भूमिगत मार्गांचे जाळे उभारणार.
- BKC येथे मुंबई आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (IFSC) महाराष्ट्र शासनाच्या मदतीने स्थापन करून तरुण व सामान्य नागरिक यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक रोजगार विषयक लाभ देणार. BKC मधील IFSC मुळे दोन लाख नोकऱ्या व १४,००० कोटींपेक्षा अधिक आर्थिक मुल्य होईल.
- मुंबईला FINTCECH सिटी बनवणार.
- विकसित मुंबई बनवण्याकरिता विकास आराखडा २०३४ केंद्र व राज्य महायुती सरकारच्या माध्यमाने १००% अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणार.

# केंद्र व राज्य सरकारच्या (डबल इंजिन सरकार) माध्यमातून विकास प्रकल्प (Mega Projects)

**पूर्ण झालेले ऐतिहासिक प्रकल्प (Successfully Completed)**



- अटल सेतू (MTHL): देशातील सर्वात लांब समुद्री पूल (२१.८ किमी), ज्यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील अंतर अवघ्या २० मिनिटांवर आले.
- मेट्रो लाईन २ए आणि ७: अंधेरी ते दहिसर दरम्यान मेट्रो धावू लागली, ज्यामुळे पश्चिम उपनगरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी झाली.
- दिघा गाव रेल्वे स्टेशन: ऐरोली आणि ठाणे दरम्यानच्या प्रवाशांसाठी नवीन रेल्वे स्थानक कार्यान्वित.

---

**प्रगतीपथावर असलेले प्रकल्प (Ongoing Projects)**

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ: मुंबई विमानतळावरील भार कमी होऊन अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार.
- ईस्टर्न फ्री वे ला ठाण्यापर्यंत पूर्ण करणार.
- मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन: देशातील पहिला हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प, ज्याचे मुंबईतील बीकेसी (BKC) स्थानकाचे काम वेगाने सुरू आहे.
- मुंबई-पुणे एक्सप्रेसवे 'मिसिंग लिंक': लोणावळा घाटातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आशियातील सर्वात रुंद बोगद्याचे काम अंतिम टप्प्यात.
- शिवडी-वरळी उन्नत मार्ग (Elevated Corridor): अटल सेतू आणि कोस्टल रोडला थेट जोडणारा मार्ग, ज्यामुळे पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी जोडली जाईल.
- धारावी पुनर्विकास प्रकल्प: आशियातील सर्वात मोठ्या पुनर्विकास प्रकल्पाद्वारे १० लाख रहिवाशांना जागतिक दर्जाची घरे आणि रोजगार देण्याचे नियोजन.



भाजपा शिवसेना

# मुंबईच्या विकासासाठी विश्वासाची महायुती

